तत्वाचा बंदा जीव मूर्तीला कोण विचारी ?

# प्रभुतरुण

Keeping the Pathare Prabhu community updated since 1923

JUNE 2024 – Issue No. DPT 02

editor.prabhutarun@gmail.com

## *From the Editor's Desk*

**कल्पना सुनील राणे**



## नावडतीची कथा

लहानपणी राजाराणीच्या गोष्टी ऐकताना राजाच्या राण्यांमध्ये एक आवडती दुसरी नावडती असे हमखास उल्लेख असायचे. आवडतीचे लाड आणि नावडतीचा दुःस्वास केला जायचा. आवडती-नावडती हे राजा ठरवायचा. मग प्रश्न असा पडायचा की राजाने नावडतीशी लग्न का केलं? तिच्या नावडतेपणात तिचा काय दोष? पण जसजसा काळ पुढे सरकला तसा हा विचार समाजाच्या सर्व स्तरात झिरपत गेला. नावडतीचं दुःख बाईच्या वाट्याला चिकटलं ते कायमचं. मुलगी, सून, पत्नी, सासू... भूमिका बदलल्या तरी तिला नावडतीचं लागलेलं बिरूद काही बदललं नाही आणि तिचे भोगही चुकले नाहीत. देशात... परदेशातही...

मला अस्वस्थ व्हायला झालं जेव्हा दोन स्त्रियांच्या जीवनगाथा वाचनात आल्या. एक भारतीय आहे तर दुसरी परदेशातली आहे. या दोन्ही स्त्रियांनी अनेक यातना भोगल्या. अगदी बालवयापासून. माझ्या मते या दोघीजणी त्यांच्या आयुष्याच्या नायिका आहेत. जितक्या बंडखोर तितक्याच कणखर. रूढी, परंपरा, प्रथा या अनिष्ट गोष्टींना छेद देत, त्यांनी परिस्थितीशी दोन हात केले. एकीने तर धर्माच्या विरोधात वक्तव्ये केली, त्यामुळे तिची पायवाट काटेरी ठरली. दुसरीने लहानपणापासून नकोशीचं दुःख झेललं... संघर्ष जसा अनुभव देतो तसाच विजयाची, कर्तृत्वाची माळ गळ्यात घालतो हेही तितकंच खरं! संघर्षाच्या टोकावरून खंबीरपणाच्या टोकापर्यंत सुनिता बोर्डे यांनी "फिन्द्री"मधून स्वतःच्या नकोशीपणाबद्दलचं दुःख मांडलंय. अयान हिरसी अली हिने "इन्फिडेल" या पुस्तकातून सोमालिया ते डच संसदेपर्यंत केलेल्या तिच्या उल्लेखनीय प्रवासाबद्दल सांगते.

मराठवाड्यातल्या एका दलित कुटुंबात एक मुलगी जन्मते. वंशाला दिवा म्हणून मुलगाच हवा या इच्छेपोटी वडील त्या नवजात शिशुला फेकून देतात. लोकांना व आईला वाटतं की त्या गोळ्यात प्राण उरलेला नाही. पण काही वेळातच ते बाळ श्वास घेतं आणि रडायला लागतं. एखाद्या सिनेमाचा सीन वाटावा अशी ही घटना... ती मुलगी जशी मोठी होऊ लागली तशी जिवंतपणी मरणयातना भोगत मोठी झाली. बापाचा राग तिच्यावर होताच पण आईने आपल्या मुलीला शिकवायचं ठरवलं. एक वेळ उपाशी राहिले तरी चालेल, पण माझ्या मुलीला शिकवणार असा निश्चय मुलीच्या आईने केला.

मुलगी बारावी बोर्डात पहिली आली. सत्कार झाला. सत्कार झाल्यावर ती घरी आली. तेव्हा कौतुकाऐवजी दारूड्या बापाने तिच्या सणकन थोबाडीत मारली. तिच्या यशाला मिळालेलं जणु ते उत्तर होतं. आईने लाथा बुक्क्या खाल्ल्या. त्यातील काही लाथा त्या मुलीने पण खाल्ल्या. जितका त्रास मुलीला झाला नसेल, त्याहून अधिक त्रास तिच्या अशिक्षित आईने झेलला. “फिन्द्री” या पुस्तकाच्या माध्यमातून स्वतःची जीवनगाथा मांडणाऱ्या लेखिका म्हणजे प्रा. सुनीता बोर्डे. त्यांच्या पुस्तकाच्या “फ़िन्द्री” या शीर्षकाचा अर्थ म्हणजे नकोशी असलेली मुलगी.

पितृसत्ताक परिस्थितीला न जुमानता आपल्या मुलीला शिक्षण देण्याची धमक असलेली आई हीच सुनीताचा आदर्श होती. शिक्षण हाच बाईची गुलामी संपवण्याचा मार्ग हे सुनीताच्या आईने पुरेपूर जाणलं होतं. पितृसत्ताक पध्दती स्त्रीला आपल्या बंधनात ठेवायला बघते. तिने कसं वागावं, बोलावं, काय ल्यावं इतकंच नाही तर काय खावं हेही पुरुषाच्या मर्जीवर ठरतं आणि जर हे नियम मोडण्याचा कोणत्याही स्त्रीने प्रयत्न केला, तर तिथे जन्म घेते हिंसा! या हिंसेची शिकार झालेली स्त्री तिच्या स्वप्नांना तिलांजली देते. पण फिन्द्रीच्या आईने तिच्या मुलीची स्वप्न स्वतः मरण यातना भोगून तशीच जिवंत ठेवली. आपल्या मुलीला शिकवलं. तिच्या पायावर उभं केलं. केवळ स्वतःला सिद्ध करून काही माणसं थांबत नाहीत तर इतरांनाही मदतीचा हात देतात.  उच्च शिक्षण घेतलेल्या सुनीता बोर्डे या  आज प्रोफेसर आहेत तसंच नकोशींना मदतीचा हात देऊन समाजसेवेचेचं कार्यही त्या करत आहेत.

---

एका कर्मठ मुस्लिम कुटुंबात वाढलेली अयान हिरसी  अलीचा जन्म सोमालियामध्ये धर्माभिमानी मुस्लिम पालकांना झाला. तिचे वडील एक बुद्धिजीवी होते. त्यांनी त्यावेळी सोमाली हुकूमशाही राजवटीविरूध्द आवाज उठवला होता, ज्याने त्यांना तुरुंगात टाकण्यात होते. तिथून ते पळून गेल्यानंतर, त्यांनी शेजारच्या इथिओपियामध्ये बरीच वर्षं घालवली. सोमाली हुकूमशहाचा प्रतिकार केला. त्या सगळ्यात ते घरापासून दूर राहिले. त्यांच्या घरातल्या अनुपस्थितीमुळे हिरसी अलीच्या आईवर तीन मुलांच्या संगोपनाची जबाबदारी आली.

पैशासाठी आणि कामासाठी तिला वणवण फिरावं लागलं. आईच्या मागे तिची आजी मुलांची सांभाळ करायची. त्यामुळे तिची आजी तिच्या आयुष्यावर प्रभाव टाकणारी एक प्रमुख व्यक्ती बनली. तिने इस्लाम धर्मावर अयान हिरसीला अनेक धडे दिले. जननांग छेदन (सुंता करणे) किती पवित्र आहे बिंबवलं. ते ऐकताना हिरसीला इस्लामने स्त्रियांवर धर्माने लादलेली बंधनं रुचली नव्हती. आजीने लहानपणापासून शिकवलेल्या गोष्टी ऐकून विश्वास-अविश्वासाच्या सीमारेषेवर ती उभी राहिली. किशोरवयात इस्लाम धर्मावरची स्वतःमधली श्रध्दा शोधण्यावर आणि तो मजबूत करण्यावर तिने लक्ष केंद्रित केले. काही काळ मुस्लिम बांधवांसोबत राहिली. पण तिला त्यात ढोंगीपणा, खोटेपणा जास्त वाटला. ज्यांचा तिला त्याचा त्रास झाला. उदाहरणार्थ, जर इस्लामने स्त्री-पुरुष समान म्हटलंय तर फक्त स्त्रियांनीच  बंधनात का राहायचं? प्रत्येक बाबतीत परवानगी मागायची?

हिरसी अलीच्या आयुष्यात एक टर्निंग पॉइंट आला जेव्हा तिच्या वडिलांनी तिला कॅनडामध्ये राहणाऱ्या एका अनोळखी व्यक्तीशी लग्न करण्यास भाग पाडले. तो वयाने बराच मोठा होता आणि विवाहित होता. कॅनेडियन व्हिसाची वाट पाहात असताना तिने जर्मनीला जायचे ठरवले. पण जाणार कशी? जरठ पती आणि लग्न नाकारून तिने नेदरलँड्समध्ये आश्रय घेण्यासाठी जर्मनीला जाण्याची संधी वापरली. तिथे शिक्षण घेतले. पदव्युत्तर झाली. जागतिक इतिहास आणि राजकीय तत्वज्ञानाची माहिती मिळवली. हॉलंडसारखे धर्मनिरपेक्ष, पाश्चात्य देश इतके समृद्ध आणि सुव्यवस्थित का आहेत, तसंच सोमालियासारखे मुस्लिम देश अराजक आणि गरीब का आहेत हे जाणून घेण्यासाठी ती प्रेरित झाली.

इस्लाम हे बंधन असल्याचं तिला वाटू लागलं कारण तो कर्मठ आहे आणि स्त्रियांवरच अत्याचार करतो.

त्यावेळी ती इस्लामबद्दल जरा स्पष्टपणे बोलल्यामुळे इस्लाम धर्मरक्षकांकडून तिची बदनामी करण्यात आली. जीवे मारण्याच्या धमक्या मिळाल्या. तिच्या अनुभवावर बनवलेल्या "सबमिशन" या चित्रपटाच्या दिग्दर्शकाची एका इस्लामिक दहशतवाद्याने हत्या केली, या घटनेने  नेदरलँड्स हादरले.

ती डच संसदेत निवडून आली. जिथे तिने मुस्लिम महिला आणि मुलांचे जीवन सुधारण्यासाठी धोरणे आखली. पण तिचा बराचसा वेळ अमेरिकेत लपण्यात किंवा हॉलंडमध्ये एका सुरक्षित जागेतून दुसऱ्या सुरक्षित ठिकाणी जाण्यात गेला. इन्फिडेलने (काफिर) आश्रयाच्या अर्जावर खोटे लिहिल्यामुळे तिचे डच नागरिकत्व रद्द केले होते. ही एक अत्यंत वादग्रस्त घटना होती ज्यामुळे सत्ताधारी सरकार विसर्जित झाले होते.

तेव्हा, हिरसी अली अमेरिकेत गेली. जिथे ती हूवर संस्थेसाठी काम सुरू केले आणि अमेरिकेतील मुस्लिम महिलांचे जीवन सुधारण्यावर लक्ष केंद्रित करणारी ना-नफा संस्था सुरू केली. इस्लामवर टीका करण्याचे धाडस केल्याबद्दल तिला अल-कायदा हिटलिस्टवर देखील टाकण्यात आले आणि दक्षिणी गरीबी कायदा केंद्राने तिला इस्लामफोब म्हणून लेबल लावले. तिच्या कथेत आणखी बरेच काही आहे आणि ते खूप विचार करायला लावणारे आहे.

बाई दुबळी आहे या संकल्पनेला छेद देऊन या दोघींने त्यांच्या खमक्या जगण्याची गाथा समर्थपणे मांडली आहे. टोकाची अवहेलना होत असतानाही चालत राहिलेल्या असंख्य स्त्रियांचं प्रतिनिधित्व करणारे विचार या दोघींने मांडले आहेत. परिस्थिती आणि बुरसटलेल्या रुढी परंपरेने ओटीत संघर्ष आणि वेदना भरली तरीही त्या अजिबात हरल्या नाहीत, डगमगल्या नाहीत. उलट संकटांच्या विरोधात पाय रोवून उभ्या राहिल्या. आयुष्याच्या वादळात चांगुलपणाची पणती विझू दिली नाही.

लेखकाचे लेखन आणि त्याचं जीवन याचं अंतर जितकं कमी तितकी ती कलाकृती वाचकाला मनाला जास्त भिडते. “As you write more and more personal becomes more and more universal.” अस्तित्व नाकारणारे अनेक प्रसंग प्रत्येकाच्या आयुष्यात येतात पण त्यावर मात करून स्वतःला सिद्ध करणं यातच आयुष्याची सार्थकता आहे. जीने के लिये सोचा ही न था दर्द संभालने होंगे... जीवन जगताना हळूहळू दर्द कळत जातो. उलगडत जातो.

तरीसुध्दा या जन्मावर या जगण्यावर शतदा प्रेम करावे, असं वाटायला लावणारी परिस्थिती आपणच निर्माण करू शकतो. हेही तितकंच खरं...

# अखेरचा निरोप
## प्रकरण दुसरे



**संजय शरद दळवी**

खरगपूरहून अचानक मुंबईत आलेला असताना क्षितिज दुपारी के जे सोमैया कॉलेजवर येऊन ठेपला होता तोच श्वेता समोरून आली. व्हॉट या प्लेझंट सर्प्राइस. कधी आलास आणि सांगितले पण नाहीसना येतोय म्हणून; अग सकाळच्या फ्लाईटने आलो. कॉलेजने दहा दिवसाची सुट्टी ख्रिसमस व्हेकेशन म्हणून डिक्लेर केली. आधी देणार नव्हते पण पोर्शन पूर्ण झाला आणि दिली सुट्टी, मग तिकडे भुतासारखा राहून काय करू? असाही माझा अभ्यास पूर्ण झालाय. बॅग घरी टाकली, आईच्या हातचे कोलंबीचे भुजणे भात खाल्ले आणि आलो तुला भेटायला. चल, लेट्स हॅव्ह सम कॉफी; ताज्या तयार केलेल्या कॉफीच्या सुगंधाने आणि संभाषणांच्या सौम्य गुंजनाने वातावरण प्रसन्न होत गेले होते. सुरुवातीला आश्चर्यचकित पण खऱ्या अर्थाने आनंदित, अनेक नव्या, जुन्या आठवणी काढत, एकमेकांच्या महाविद्यालयीन अनुभवांच्या कथा शेअर करत जवळ जवळ दोन तास क्षितीज आणि श्वेता उबदार स्मितांची देवाणघेवाण करत प्रासंगिक संभाषणात गुंतले. त्यांची शेवटची भेट होऊन सहा महिने लोटले होते त्यामुळे अधिक असलेली आपलेपणाची भावना दोघांनाही भावली होती. स्पष्टपणे जरी त्यांच्यामध्ये रोमँटिक स्वारस्य नसले तरी त्यांच्या परस्परसंवादात, एक अंतर्निहित गोडवा होता जी सामायिक झालेल्या बंधनाची सूक्ष्म पोचपावती होती, पण ना हे त्यांना जाणवले आणि जाणवले असेल तरीही ना हे त्या दोघांपैकी कुणी बोलून दाखवले. भरपूर गप्पा मारून संध्याकाळी सातच्या सुमारास तिला घरी सोडून क्षितिज आपल्या घरी परतला. त्याची हार्ले डेव्हिड्सन आणि ही दोघे मग पुढचे दहा दिवस सतत घुमत होते. दोघेही आपल्या घरी कमी आणि बाहेरच जास्त असत.

सुट्टी संपवून परतल्यानंतर मात्र दोघेही आपापल्या अभ्यासात गर्क होऊन गेले. त्याने आयआयटी, खरगपूर, येथून बी.टेक. करून मास्टर ऑफ सायन्स (एम.एस.) ला प्रवेश घेतला तर गव्हर्मेंट ऑफ इंडियाच्या स्पेस सेंटरची नोकरी आणि शिष्यवृत्ती स्वीकारून श्वेताने एम.टेक. ला नाव नोंदवले. अधून मधून त्याच्या मुंबईच्या फेऱ्या होत तेंव्हा बहुतांशी ती दोघंही जवळजवळ सारा दिवस एकत्रच असत. त्यांच्यात जरी काही स्पेसिफिक असे बोलणे झाले नव्हते तरी दोघांच्याही घरच्यांनी त्यांच्यातले नाते गृहीत धरले होते. दोघेही हुशार, अभ्यासू आणि अति महत्वाकांक्षी. त्यामुळेच स्वतःच्या भावना न समजून घेत ते करिअर करण्यातच गर्क होते. एम.एस. ला गोल्ड मेडल मिळवून पास व्हायच्या आधीच क्षितिजला नासा आणि इस्रो कडून नोकऱ्यांचे आमंत्रण आले होते, त्यातल्या इस्रोला पसंती देत क्षितिजने बंगलोरला शिफ्ट होण्याचे ठरविले, तर श्वेताने एम.टेक. होऊन गव्हर्मेंटचा दहा वर्षांचा इर्रेव्होकेबल बॉण्ड साइन केला आणि ती मुंबईतच राहणार हे स्पष्ट झाले.

इस्रोला जॉईन व्हायच्या आधी ब्रेक पिरिअड मध्ये क्षितिज मुंबईला आला तेंव्हा त्याला श्वेताचे हे बॉण्ड प्रकरण कळले, आणि तो वैतागलाच. भेटल्या भेटल्याचा त्याने तिला विचारले की हे काय करून ठेवले आहेस तू? क्षितिजने नासाला डावलून इस्रो जॉईन करताना आपल्याला काहीच न विचारल्याचा राग श्वेतालाही आला होता. अर्थात त्याने विचारले असते तर तिनेही त्याला इस्त्रोलाच जॉईन हो म्हणून सांगितले असते हेच खरं होत पण त्याने खडसावल्यावर तिनेही त्याला टोचून म्हटले, बंगलोरला शिफ्ट होण्याचे ठरविताना आपण काही माझ्याशी डिस्कस केले होते का, तर मी बॉण्ड साइन करताना तुझ्याशी का म्हणून बोलायला हवे होते? मी तर मुंबईतच जन्मले, आणि मुंबईतच राहण्याचा साधा क्रम पाळलाय, पण तू तर दूर सेटल व्हायला निघालायास मग तूच नव्हते का आधी बोलावयास हवे होते?; प्रश्न बिनतोड होता. त्यामुळे थोडा नरम पडत क्षितिज अजीजीने उद्‌गारला, बरोबर आहे तुझे, पण मला वाटले होते की तुला आनंदच होईल म्हणून, मग... ; आनंदच झालाय मला, काँग्रट्स टू यु, पण मलाही इथेच प्रोस्पेक्ट्स चांगले होते मग केला मी बॉण्ड साइन; पण श्वे... बट व्हाय साइन इर्रेव्होकेबल बॉण्ड अँड दॅट टू फॉर टेन इयर्स?; कारण वार्षिक पंधरा लाखा ऐवजी इर्रेव्होकेबल बॉण्ड मुळे मला पंचवीस लाखाचे पॅकेज मिळालंय. आम्ही तुमच्या सारखे गर्भश्रीमंत नाही आहोत क्षितिज. तू नासा सोडून इस्रोला निवडू शकलास, कारण पैसे तुला गौण आहेत, पण माझं तस नाही. बाबा पुढच्या वर्षी रिटायर होत आहेत. आई, आम्ही तिघी जणी, बहिणी अजून शिकताहेत, मधली वीणा तर मेडिकलला आहे, मला पैसे कमावयालाच हवेत; पण मग, आता पुढे... आपले, आपले....; काय आपले? अरे काय बोलतो आहेस तू? ; क्षितिज पुढे काहीच बोलला नाही. श्वेताच्या लक्षात ते आलं होतं की नाही, कुणास ठाऊक, पण कधी नव्हे ते ती निर्विकार भासत होती. निघायचे? ह्या क्षितिजच्या प्रश्नावर होकार भरत ती उठली. क्षितिजने आज बाईक न आणता गाडी आणली होती ह्याचा त्याला पहिल्यांदाच आनंद झाला. अतिशय मूकपणे त्यांचा कालिना ते पार्ले हा छोटेखानी प्रवास पार पडला. तिला ड्रॉप करून त्याने गाडी फिरवली, बंगल्या पुढे आणून लावली पण तो घरात नाही गेला. जवळच्याच ग्रीन्स मध्ये जाऊन टेकला आणि आलेल्या बेराला व्हिस्कीची ऑर्डर देऊन शांत पणे बसून राहिला.

रात्रीचे दहा वाजून गेल्यावर मात्र त्याच्या आईचे पित्त खवळले. अहो हा मुलगा दुपारीच बाहेर पडलाय आणि अजून आला नाहीय. मी तीनवेळा फोन केले पण त्याने ते घेतले नाहीत. त्या श्वेतालातरी फोन लावून बघा जरा, म्हणत तिने यजमानांना ढोसकले. अग, एवढा मोठा सायंटिस्ट झालाय आणि तू काय त्याच्या पाठीशी लागतेस असे म्हणत विनायकरावांनी क्षितिजला फोन लावला पण फक्त रिंगचं वाजतेय बघून त्यांनी मग श्वेताला फोन लावला. तो अजून घरी पोचला नाही म्हटल्यावर ती सुद्धा उडालीच. नाही म्हटले तरी तिलाही तिचे मन खात होतेच. अहो काका, पण त्याने तर मला सात, सव्वा सातलाच घरी सोडले, आणि हा आता कुठे जाऊन लपून बसलाय; बघतो मी. भेटले असतील कोणी मित्र. फोन उचलत नाही म्हणून थोडी काळजी वाटली, एवढेच. भेटला की कळवतो मी; म्हणत विनायकरावांनी फोन कट केला. समोरचा ग्लास बाजूला सारून त्यांनी व्हरांड्यात येत एक सिगारेट पेटवली, आणि परत क्षितिजला फोन लावला.

रिंग जात होती, पण त्याचबरोबर त्यांना बाहेरूनही रिंगचा टोन ऐकू येऊ लागला, म्हणून ते चार पायऱ्या उतरून वळले, तो क्षितिजने लावलेली गाडी त्यांना दिसली, आणि आवाज त्यातूनच येत होता. बारकाईने बघता त्यांना कळले की क्षितिजने गाडी घरीच आणली आहे आणि त्याचा फोन मात्र बंद गाडीमध्येच आहे. आता तो फोन तिथेच विसरला की ठेवून गेला हे कळायला मार्ग नव्हता. घरात परत शिरत त्यांनी सुरेखाला हाक मारून सांगितले की क्षितिज घरीच गाडी लावून आणि फोन गाडीत विसरून बाहेर गेलाय म्हणून. त्याने श्वेताला सातच्या सुमारास घरी सोडल्याचे आणि ती आता तिच्या घरीच असल्याचेही त्यांनी तिला सांगितले. अरे कर्मा, आता ह्याला शोधायचे कुठे असे त्या म्हणताहेत तोच विनायकरावांचा फोन वाजला. त्रासिक चेहऱ्याने त्यांनी तो घेतला पण फोनवरचे बोलणे ऐकून त्यांनी फक्त, बरे, बरे, मी येतोच पाच मिनिटात म्हणून फोन कट केला आणि बायकोकडे बघत महणाले, क्षितिज समोरच आहे. आलोच मी, असे म्हणत त्यांनी गाडीच्या चाव्या व पर्स उचलत बाहेरचा रस्ता धरला.

साधारणपणे अर्ध्या तासाने विनायकराव एका मुलाच्या साहाय्याने अर्धवट शुद्धीत असलेल्या क्षितिजला आधार देत घरी घेऊन आले. सुरेखाच्या चेहऱ्यावरील प्रश्नचिंन्हांकडे दुर्लक्ष करत, शांत राहा अशी खूण करून त्या मुलाच्या मदतीने त्यांनी  क्षितिजला त्याच्या रूममध्ये नेले. त्या मुलाच्याच साहाय्याने त्याचे बूट काढून त्यांनी त्याचा शर्ट बदलला आणि त्याला बिछान्यावर निजवून, अंगावर पांघरून घालत त्यांनी एसी लावला, व दिवा मालवून नाईट लॅम्पच्या मंद प्रकाशात त्यांनी रूमचा दरवाजा ओढून घेतला. पाचशेच्या दोन नोटा त्या मुलाला देऊन त्यांनी घराचा दरवाजा बंद करून घेतला आणि ते जवळ जवळ सोफ्यावर कोसळलेच. पाच एक मिनिटांनी डोळे उघडून तिथे उभे असलेल्या सुरेखाकडे बघून त्यांनी त्यांची कहाणी ऐकवली. त्यांना आलेला फोन हा ग्रीन्सच्या मॅनेजरचा, सुधीर शेट्टी ह्याचा होता. हॉटेल ग्रीन्स त्यांच्या बंगल्याच्या बरोबर समोरच असल्यामुळे सुधीरची क्षितिजशी आणि विजयकर कुटुंबाशी तोंडओळख होती. साधारणतः साडेसातच्या सुमारास पहिला पेग मागवलेल्या क्षितिजने दहा वाजेपर्यंत जवळ जवळ एक बाटली संपवली होती. पहिल्या पेग बरोबर मागवलेल्या चिकन चिल्लीला मात्र त्याने हातही लावला नव्हता. त्याने मागवलेल्या बाराव्या पेगनंतर सुधीर त्याच्याकडे गेला आणि थोडी चौकशी केली. क्षितिज त्याला तसा सोबर वाटला पण पुढच्याच वाक्याने सुधीर हादरला, कारण क्षितिज म्हणाला की चिंता नको, मी बिल देतो आता आणि हा पेग संपला की मी जाऊन जीव देणार आहे. सुधीरने मान वळवून बाहेर बघितले तो त्याला बंगल्यावर दिव्याच्या उजेडात चमकणारी सॉलिसिटर विनायक विजयकर, सुप्रीम कोर्ट, ही पाटी, व त्याच्या खालचा मोबाईल नंबर दिसला, आणि त्याने मागचा पुढचा विचार न करता तो नंबर डायल केला जो विनायकरावांनी उचलला होता. सर्व सांगून झाल्यावर सुरेखा त्यांना म्हणाली आधी श्वेताला फोन करून सांगा की क्षि घरी आलाय म्हणून आणि विचारा की हा काय प्रकार आहे तो?; नको रेखा, म्हणजे मी तिला तो घरी आल्याचे कळवतो पण पुढचे सारे काही फक्त आपल्या तिघा मद्धेच सध्या तरी राहूदे, असे म्हणत त्यांनी श्वेताला मोबाईल कॉल केला. आठ दहा रिंग नंतर झोपाळलेल्या आवाजात श्वेताने हॅलो म्हटले.

ओ, सॉरी, झोपलीस का ग? काही नाही, क्षितिज इथेच घराबाहेर होता. आला आता तो घरी. गुड नाईट, म्हणत त्यांनी फोन कट केला. त्यांच्या एका कटाक्षाने सुरेखाला त्यांना काय म्हणायचे आहे ते कळले. क्षितिज घरी आलेला नाही म्हटल्यावर त्याला फोन करायचा किंवा निदान त्याची थोडी तरी काळजी करावी असेही श्वेताला वाटू नये ह्याचेच त्या दोघांनाही आश्चर्यचं वाटले होते. कपडे बदलून विनायकराव त्या रात्री क्षितिजच्या खोलीतल्या सोफ्यावरच निजले.

दुसऱ्या दिवशी क्षितिजला जरा लवकरच जाग आली. जागेवर पडून राहूनच त्याचे विचारचक्र सुरु होते. डोके तर फुटल्यासारखे दुखत होते. घुसमट सहन न होऊन तो उठला तो त्याची नजर बाजूच्या सोफ्यावर झोपलेल्या वडिलांवर पडली आणि त्याही परिस्थितीत त्याला खूप काही आकलन झाले. तो बाथरूम मधून थोडा फ्रेश होऊन बाहेर येतो तर विनायकराव तिथेच उठून बसलेले त्याला दिसले. एवढा शिकलेला सवरलेला आणि मोठा झालेला असूनही क्षितिजची त्यांच्या नजरेला नजर द्यायची हिम्मत नाही झाली. तो फक्त पुढे झाला आणि त्याने वडिलांच्या खांद्यावर डोके टेकले. आजवर ज्याला फुलासारखा जपला, आणि त्यानेही कधीच मान खाली घालायची वेळ नाही आणली, किंबहुना, त्यांची मान ज्याने सदैव उन्नतच ठेवली, त्याला असा घायाळ झालेला बघून त्याला जवळ घेताना विनायकरावांनाही भरून आले. त्याच्या पाठीवर थोडे थोपटत ते त्याला बाहेर घेऊन गेले आणि डायनिंग टेबलाशी त्याला बसवले. त्यांनी बायकोला बोलवयाच्या आधीच सुरेखा गरम काळी कॉफी व क्रोसीन घेऊन आल्या व त्यांनी क्षितिजला गोळी घ्यायला लावली. त्याचे कॉफीपान संपेस्तोवर घमघमणारे डबल आम्लेट व टोस्टेड ब्रेडची डिश सॉस सहित टेबलावर मांडली. नंतर विनायकरावांकडे वळत त्यांनी त्यांना फ्रेश होऊन येण्यास सांगितले. इतक्यात सखूबाईने चहाची किटली आणून ठेवली होती त्यातला चहा त्यांनी क्षितिजसाठी व आपल्यासाठी ओतून घेतला आणि म्हणाल्या कर सुरुवात. 'आई, .. नंतर बोलूच आपण क्षि, पण आत्ता तुला हे खाणे जरुरीचे आहे, म्हणत त्यांनी ब्रेडचा छोटा तुकडा मोडून ऑम्लेटबरोबर त्याला भरवला. क्षितिजच्या डोळ्यात आलेले पाणी हळूच टिपत त्यांनी त्याच्या डोक्यावर थोडे थोपटले आणि खाण्याची खूण केली. पुढचा अर्धा तास शांततेत गेला. फ्रेश होऊन आलेल्या विनायकरावां बरोबर सुरेख ताईंनीही आपला ब्रेकफास्ट घेतला आणि क्षितिजने भरपूर खाल्ले आहे ह्याची खात्री झाल्यावर त्यांनी त्याला अंघोळीस पिटाळले.

साधारणपणे अकराच्या सुमारास तिघेही गच्चीवरच्या बागेत दिवसाचा दुसरा चहा घेऊन विसावल्यावर क्षितिजने विषयाला तोंड फोडले. आई, बाबा, काल रात्री मी काय केले हे माहित नाही. मी घरी कसा आलो, कुणी आणून सोडले मला, शर्ट कुणी बदलला, बूट कुणी काढले, मला काहीही आठवत नाही. आय एम सॉरी, परत नाही वागणार असा, म्हणून तो गप झाला. तरीही आई, बाबा, काहीच विचारत नाहीत ह्यामुळे अस्वस्थ होऊन तो उठला आणि त्याने बागेतच फेऱ्या मारायला सुरुवात केली तो विनायकरावांनी त्याला हाक मारली, म्हणाले, क्षितिज, बस इथे.

तू अस्वस्थ आहेस कारण तुला वाटते की आम्ही दोघे तुला प्रश्न का विचारत नाही आहोत ते, पण मला असे सांग, की ज्याची उत्तरे आपल्याला बहुधा माहित आहेत ते प्रश्न तुला पुन्हा विचारून आम्ही तुला अजून का दुखवावे? ; म्हणजे? ; क्षि, तू काल दुपारी कुठे गेला होतास? काहीच उत्तर न मिळाल्यावर ते पुढे म्हणाले, तू नेहमीप्रमाणे श्वेताला भेटायला गेला असणार. नाही, तिच्याशी रात्री बोलणे झाल्यावर तिनेच सांगितले मला की तू तिला सात सव्वा सात पर्यंत घरी सोडले होतेस म्हणून. मी एक मुरलेला कायदेपंडित आहे बेटा, आणि माझ्या एकुलत्या एका मुलाची जर का मला ओळख पटत नसेल तर काय अर्थ आहे ह्या पंडीत्वाचा? तुला झालेल्या उशिरा मुळे हिने तुला दोनदा फोन लावला होता, आणि तो तू न घेतल्यामुळे मी रात्री साडे दहाच्या सुमाराला श्वेताला फोन केला होता. नंतर खाली व्हरांड्यातून तुला परत फोन लावला तेंव्हा मला त्याची रिंग ऐकू आली आणि नीट बघितल्यावर कळले की तू फोन गाडीतच विसरून गेला आहेस म्हणून. तितक्यात मला समोरच्या ग्रीन्स मधून सुधीर शेट्टीचा फोन आला तेंव्हा मी तिथे येऊन त्याच्याच एका माणसाच्या मदतीने तुला घरी आणले. तू झोपल्यावर काळजी वाटू नये म्हणून मी श्वेताला तू घरी सुखरूप पोचलस हे कळवायला फोन केला तर ती त्या वेळी जवळ जवळ गाढ झोपेतच होती. दोन अधिक दोन, चार, ह्या उक्तीप्रमाणे मी माझे ठोकताळे बांधले आणि लक्षात आले की श्वेताने एम.टेक. होऊन गव्हर्मेंटचा दहा वर्षांचा इर्रेव्होकेबल बॉण्ड साइन केल्यामुळे तुमच्यात काही वाद झाले असणार, ज्याची परिणीती तुझ्या पुढच्या वागण्यात प्रतिबिंबित झाली, एव्हढे बोलून विनायकराव शांत झाले, पण क्षितिजचे डोळे मात्र विस्फारले गेले. खरंच बाबा, ता वरून ताकभातही ओळखून मोकळे झालात तुम्ही. आमचे भांडण नाही झाले म्हणत त्याने त्यांच्यातले झालेले सारे संभाषण आई बाबांना सांगून टाकले. आता काय, ह्या प्रश्नावर सेकंदाचाही विचार न करता तो म्हणाला, एक दिवस, फक्त आजचा एक दिवस मी तिची आणि तिच्या फोनची वाट बघीन, नाहीतर ... पण क्षि, तुला कल्पनाही नाही की तू किती गुंतला आहेस तिच्यात ते. तुला ठाऊक आहे काल मला सुधीरने का फोन लावला ते? तू नंतर घरी आल्यावर थोडा डाऊन झाला होतास पण तुझ्या बाराव्या पेग नंतर सुधीरने जेंव्हा तुझी थोडी चौकशी केली तर तू त्याला म्हणालास की चिंता नको, मी बिल देतो आता आणि हा पेग संपला की मी जाऊन जीव देणार आहे. जीव द्यायचे विचार तुझ्या मनात घोळले कारण तू श्वेतामध्ये पूर्ण इन्व्हॉल्व झाला आहेस. कॅन यू लिव्ह विदाउट हर?; आय विल, कारण बाबा आम्ही दोघेही करिअरिस्टिक आहोत, आणि श्वेता जरी खूप चांगली असली तरी ती फार हेड स्ट्रॉंग आहे. त्यातच आम्ही दोघांनाही एकमेकांना फारच गृहीत धरले होते. ना कधी आम्ही प्रेमाच्या शपथा खाल्ल्या, ना कधी कुठल्या गुजगोष्टी केल्या. आईवडिलांशी पटकन नाही बोलता येत पण ओपनली सांगतो, आम्ही कधी एकमेकांना साधा हातही नाही लावलाय. मला नक्कीच तिची कमी जाणवेल, कारण तुम्हा दोघांशिवाय मला आतून बाहेरून ओळखणारी दुसरी व्यक्ती अजून तरी फक्त तीच आहे. ती जर का मला म्हणाली की थांब म्हणून तर मी थांबेनही मुंबईतच पण फक्त आजचा एक दिवस मी तिची किंवा तिच्या फोनची वाट बघीन, नाहीतर मी इस्रो जॉईन करीन, एव्हढेच बोलून तो तिथून खाली निघून गेला. पण ना श्वेताने फोन केला, ना ती त्याला भेटायला आली. एक कहाणी सुरु होण्या आधीच संपून गेली.

- संजय शरद दळवी

# विमुक्त

**मुकुला राणे नवलकर**



दूरवर ठिपके,हलते.
ठिपक्यांची रांगच,हळूहळू पुढे सरकणारी.
एकापाठी एक ठिपका,अंतर राखून.
कधी एखादा चुकार,
रांग मोडून,आगेमागे रेंगाळणारा.

चालून चालून सांजावलं की,
ओसाड माळरानावर पालं पडतात.
दाटत जाणाऱ्या अंधाराला उजळवत,
पेटणाऱ्या जाळावर एकवेळची सोय होते.
त्याच धगीच्या सोबतीला,...चांदणं पांघरुन रात्र
सरते.

दिवस फटफटतो तेव्हां,सारं आवरुन,
पुन्हा पायपीट.
पुढच्या मुक्कामी पोहचेपर्यंत,
कुठेही थांबणे नाही.
कुठेही स्थिरावणे नाही.
कुठेही रुजणे नाही.
फक्त चालत,चालतच राहाणे.

विचार,भटके विमुक्त.
जणू लमाणांचा तांडा...
विचार बेघर निर्वासित.
दिशाहीन ठावठिकाणा...

आभाळाचा भरवसा.., .
आणि मातीचे ऋण.
चालण्याचा वसा...,
आणि जीणं पसा,पसा

विचारांचा हा तांडा असाच,
या इथून त्या तिथे,जात रहातो.
अतीताची ओझी डोक्यावर,पाठीवर
खांद्यावर वागवत..
आणि कडेवरची वंशावळ सांभाळत...
चालत रहातो.

विचार,मागून येतात आणि पुढे निघून
जातात.विचार इथे,थांबतच नाहीत.

विचार नक्की येतात कुठून... ?
आणि विचार नेमके जातात तरी कुठे....?

नदीचं मूळ आणि ऋषींच कूळ शोधू नये
म्हणतात.
पण विचारांच तसं नसावं.
मग तर एकदा त्यांनाच विचारलं पाहिजे
चांगल हडसून खडसून विचारलं पाहिजे....

अरे,चाललय काय तुमचं?
सहजच,मोकळे मोकळे भटकता आहात?
की सैरभैर,वेडेपिसे भरकटले आहात?
का करता आहात,ही असली थकवणारी पायपीट ?

की सुखात आहात ?
स्वच्छंदीपणे वाटचाल उपभोगत,
क्षणभंगुर जीवनाचा उत्सव,
साजरा करीत आहात ?

जन्म आहे म्हणून अनिवार्यपणे जगणे आले.

त्यातून,काय मिळवायचे आहे?
काय मिळाले आहे?
काय मिळणार आहे?

कधीतरी थोडे थांबा आणि याचा हिशेब मांडा.
काय काय कमावले आणि कसे कसे ?
काय काय गमावले आणि का ?

तुमच्यातही असतील....
काही गंभीर,काही खट्याळ...!
काही खंबीर,काही..थिल्लर..भिरभिर.! .
काही दणकट,काही नाजूक झिरमिर....!

कधीतरी चालता चालता,एखादं बी रुजवा.
कधीतरी जाता जाता,एखादी ओळ सजवा
सगळे मिळून कधीमधी,आनंदकंद फुलवा.

मुक्त होण्यासाठी म्हणे,तुम्हाला आवरावं लागतं.
घट्टमुट्टपणे सारं काही, निमूट विसरावं लागत.

पण तुम्ही तर मूळचेच मुक्त... कलंदर..!
कोठूनही येता आणि कोठेही जाता.

मग का बाळगावी तुमची तमा ?
या तुम्ही, हवे तेव्हां.. !
जा किंवा रहा....!
का उठावा कल्लोळ तुमच्या
येण्याने वा जाण्याने...?

तुमच्या कोलाहलात आता गुंतणे नाही.
तुमच्या नवथरतेचे,आता अप्रूप नाही.
तुमच्या नोकझोक,आता गोंजारणे नाही.
कारण यासगळ्यांची गोळाबेरीज म्हणजे एक मोठ्ठ शून्य असतं.... !

आता त्या शून्याचाच वेध घ्यायचा आहे.
केन्द्रस्थ रिती शून्यता,अनुभवायची आहे.
तुमचा गोतावळा सांभाळून,
त्याच शून्यात विरघळून विरायचे आहे.

विचारांचा तांडा आणि
एक बंजारा....
फिरतो आहे आपल्याच सोबतीने.
फिरुन फिरुन येतो आहे,त्याच जागी.
यातून आता मोकळे व्हायचे आहे.
खऱ्याअर्थाने बंधमुक्त... विमुक्त... .!!!

मुकुला राणे नवलकर

# कशासाठी जाऊंदे, कोणासाठी तरी, असा विचार करी

**संजय शरद दळवी**



शेक्सपिअर लिहून गेलाय, Never explain. Friends don’t need it, and enemies do not deserve it! पण हे खरंच असते का असे?

मनुष्याने बहुतांशी वागणुकीचे समर्थन करू नये. कारण जे आपले आहेत, जोडीदार, आप्त, मित्र, सगे, संबंधी, इत्यादी, ह्यांना अश्या स्पष्टीकरणाची जरूर भासत नाही, कारण ते आपल्याला समजून घेतात आणि जे आपले नाहीत, तथाकथित शत्रूही म्हणाना, अश्यांना आपल्या वागणुकी बद्दल स्पष्टीकरण द्यायची जरुरी नसते. जोवर आपण आपल्या मनात आपल्या वागणुकी बद्दल स्पष्ट असतो तेथे इतरांना असे स्पष्टीकरण का द्यावे? पण तरीही, अश्या खूप गोष्टी असतात, ज्यांचे स्पष्टीकरण आपल्याला द्यावेसे वाटते, अन्यथा दुसऱ्यांच्या मनात काही विकल्प येईल अशी सार्थ भीती वाटत असते. उदाहरणार्थ, कोणा क्ष व्यक्तीने आपल्याला एखाद्या समारंभाचे आमंत्रण दिलेले असते, पण काही कारणास्तव ना आपल्याला जायला जमते, ना आपण तशी आगाऊ सूचना देऊ शकतो. अश्या वेळी आपण का उपस्थित नाही राहू शकलो हे स्पष्ट करावेच लागते.

पण हे एक ढोबळ उदाहरण झाले. कधी कधी आपल्या जवळच्या व्यक्तीकडून असे काही घडून जाते, ज्याचे स्पष्टीकरण मिळून सुद्धा मनुष्य समाधानी नसतो. त्या घडलेल्या गोष्टी बद्दल आणि आपल्या जवळच्या व्यक्ती बद्दल आपल्या मनात विपरीत विचार येत राहतात. त्याने, अथवा तिने असे का केले, वा तो अथवा ती असे का बोलली असावी, ह्याचे आपण निरनिराळे तर्क वितर्क आपल्याच मनात मांडत रहातो. अश्या वेळी स्पष्ट बोलणे हे सर्वोतोपरी योग्य असते, पण नात्यांच्या बिकट गुंतागुंतीत असे काही विचारणे अप्रस्तुत तर ठरणार नाही ना, ह्या विचाराने मनुष्य गप्प बसतो. मोठ्या अवघड जागीचे दुखणे होऊन बसतात अश्या गोष्टी. असल्या गोष्टींचा वेळीच निचरा नाही झाला तर त्यांचा मनुष्याच्या प्रकृतीवर निश्चितपणे परिणाम होतो. आडातच नसेल तर पोहऱ्यात तरी कुठून येणार, असा विचार न करता, मनुष्य आपल्या मनाला बेलगाम सोडतो आणि वाटेल तसे विचार त्याच्या अथवा तिच्या मनात पिंगा घालू लागतात. सारासार विचार बुद्धी त्याला सोडून गेलेली असते.

हृद्यरोग हा काय प्रकार आहे हे समजणे फार अवघड आहे. 'मुंबई-पुणे-मुंबई २' ह्या चित्रपटात मुक्त बर्वेच्या तोंडी एक नितांत सुंदर वाक्य आहे. तत्सम ती विचारते, 'आपण कोणाशी भांडतो, आपल्या माणसाशी ना' - आपण ज्याच्यावर किंवा जिच्यावर प्रेम करतो, त्या व्यक्तीशीच आपण आपल्याला खुपलेल्या गोष्टी बद्दल भांडू शकतो ना? तसेच आरडी ने आप की कसम मध्ये किशोरच्या आवाजात एक भन्नाट गाणे दिलंय. त्यातल्या काही पंक्ती अश्या आहेत - "आंख धोखा है, क्या भरोसा है, सुनो दोस्तो, शक दोस्ती का दुष्मन है, अपने दिल में इसे घर बनाने ना दो, .......... बाद में कोई पुकारा करें उनका नाम, वो फिर नहीं आते"

मन: चिंती ते वैरी न चिंती हि म्हण अक्षरश खरी आहे. प्रश्न असा असतो की असे काय घडले ह्या विचारात माणूस इतका गुंगतो, की त्याला खाण्या पिण्याची शुद्ध राहत नहीं. जणू कुणी एखादे गारुड केले असते त्या मनावर. अर्थात नितांत प्रेम असल्या शिवाय ह्या गोष्टी होत नसतात, पण आपण जिच्यावर किंवा ज्याच्यावर प्रेम करतो आहोत, त्या व्यक्ती बद्दल मनातले गहन प्रश्न अनुत्तरित राहिले की मनुष्य अधोगतीला लागतो. त्याचे एक मन त्याला बजावत असते की हे चुकीचे आहे, थांबव हे सारे, पण दुसरे मन त्याला ढकलत असते. अश्या वेळी एखाद्या बाहेरच्या समजूतदार व्यक्तीने ह्यात दखल देऊन हस्तक्षेप करायला हवा असतो. पण हल्लीच्या चौकोनी अथवा फक्त दोघांच्याच संसारात कुठे असते कुणी त्यांच्या सोबत. पूर्वी वडीलधाऱ्यांनी घरे गजबजलेली असत. पाठीवर मायेचा हात ठेवून समजावयाला घरची मोठी माणसे असत. सध्या ती जागा बाह्य कौन्सलरने घेतली आहे, पण तिथे जाणेही सोपे नसते. मनाला वेसण घालता येत असती, तर काय जरूर आहे कौन्सलरची? प्रत्येकाचा अहंकार, साध्या इंग्रजी शब्दात सांगायचं तर इगो नक्कीच आडवा येणार असतो.

ह्यावरच उपाय प्रत्येकानं आपलाच शोधायचा असतो. कोण बरोबर आणि कोण चूक ह्या विचारात न गुंतता, एक नक्की असते की दोन्ही बाजू प्रचंड दुखावलेल्या असतात. त्यामुळे, प्रयत्न दोन्ही बाजूने व्हायला हवेत. न विचारताच पडलेल्या प्रश्नांची उत्तरे मिळाली तर कदाचित अहंकारही मिटू शकतो, आणि मग असे विचार आलेच कसे मनात, आणि हे पुढे होऊ नये म्हणून दुसरी बाजूही कौंसल्लिंग करून घ्यायला तयार होण्याची शक्यता असते. पण दोघेही आपापल्या जागी अडिग राहिले, तर पहिल्यांदा एकाच ऱ्हास होणे अटळ असते, आणि तसे झाले तर दुसऱ्या बाजूवरही गहिरा परिणाम होऊ शकतो.

व. पु. काळे किती सुंदर लिहून गेले आहेत. विश्वास आणि दिलासा यात अंतर आहे. विश्वास तुझ्यात असेल तर तू बघतोस आणि दिलासा इतरात असेल तर इतरांना बघतात. कवितेचा प्रवास हा जीवनाच्या प्रवासाशी अगदी जुळतो. प्रत्येक कवितेत एक छोटीशी जीवनाची कहाणी लपलेली असते. काव्य हे जीवनाचे गुढ रहस्य आणि जीवनच काव्याचे गुढ रहस्य आहे.

बघितलेत ना, माझे हे असे होते. शेक्सपिअर पासून सुरु झालो आणि वपुं जवळ येऊन ठेपलो. दुःख आणि डोंगर यांच्यात साम्य असत. लांब अंतरावरून दोन्ही गोजिरी दिसतात. एका डोंगराला पार करावं तर त्याच्यामागे दुसरा डोंगर असतोच. तसच दुःखाच. जवळ गेलं की या गोष्टी जास्तच भव्य वाटू लागतात.त्यांचं रौद्र रूप लांब गेलं की गोजिरवाणे होते. त्यामुळे प्रत्येकाने आपल्या दुःखा पासून दूर जायला हवे. त्याला भिडून त्याची रौद्रता वाढविण्या पेक्षा, त्याला दूरच ठेवायला शिकायला हवे.

आपण कसली तरी चाकोरी निर्माण करतो. अगदी चहा वा दारू पिण्याची. त्या चाकोरीला आपण शरण जातो. इतकं की आपल्या संमतीची वाट न बघता ती आपल्या वतीने निर्णय घेते. वयानुसार सवयी बदलतात, पण मग वय झाले तरी सवय राहते. नियती एक कोरा, करकरीत दिवस सुर्योदयाबरोबर तुम्हाला बहाल करते. रात्र म्हणजे कालचा फळा पुसून लख्ख करणार डस्टर.

त्या स्वच्छ फळ्यावर आपण कालचेच धडे का लिहायचे? जो नव्या दिवसाला कोऱ्या मनाने समोरा जातो, नवा मजकूर लिहितो, तो लेखक नसेल पण प्रतिभावंत असतो.

किती बोललं यापेक्षा किती ऐकलं गेलं याला जास्त महत्व आहे, किती खाल्लं यापेक्षा किती पचल, किती पाहिलं यापेक्षा किती दिसलं हे ज्यांना समजत नाही त्यांना आपल्याला कशाचा थकवा आलाय हेही समजत नाही.

**अत्यंत महागडी, न परवडणारी, खऱ्या अर्थाने ज्याची हानी भरून येत नाही अशी गोष्ट किती उरली आहे, याचा हिशेब नसताना आपण जी वारेमाप उधळतो ती गोष्ट म्हणजे आयुष्य....**

आपत्ती पण अशी यावी की त्याचाही इतरांना हेवा वाटावा. पडून पडायच तर ठेच लागून पडू नये. चांगलं दोन हजार फुटांवरून पडाव. माणूस किती उंचावर पोचला होता, हे तरी जगाला समजावं. माणूस फक्त भेद ओळखतो, निसर्ग फक्त भाव जाणतो... भेदातून जात निर्माण झाली. आई, बाप, मुलगी. ही नाती आपण निर्माण केली. निसर्ग मात्र फक्त स्त्री आणि पुरुष एवढाच भाव ओळखतो. प्रॉब्लेम नसतात कोणाला? प्रत्येक प्रॉब्लेमला उत्तर असतच. ते सोडवायला कधी वेळ हवा असतो, कधी पैसा, तर कधी माणसं! ह्या तीन गोष्टींच्या टप्प्यापलीकडचा प्रॉब्लेम अस्तित्वात नसतो. स्वप्नांचा आणि सुगंधाचा फार जवळचा संबंध असतो. शेवटी दोघांची राख होते.

माणूस फसतो केव्हा? आपल्याला काय मिळवायचं होत हे जेव्हा माणसाला समजत नाही त्यावेळी तो फसतो. आयुष्यभर सुखाच्या, ऐश्वर्याच्या मागे पळत राहतो. हवी ती वस्तू मिळवल्यावर पण तो सुखी नसतो.तो निर्भयता शिकत नाही. नेहमी कशाची ना कशाची तरी धास्ती वाटत राहते. जो निर्भय व्हायला शिकला तो जीवनातली गोष्ट नव्याने समजेल.

प्रेम करताना मनुष्याने तुटून प्रेम करावे. डोळे गेले तरी चालतील, पण नजर शाबूत हवी. स्वर नाही सापडला तरी पण नाद विसरणार नाही. पाय थकले तरी बेहत्तर, पण गतीची ओढ टिकवून धरीन. ही भूक कायम असली की झालं. आयुष्यात ही भूक जिवंत ठेवावी आणि निर्भयतेने पुरी करावी.

तेंव्हा आपला विचार आपणच करायचा असतो. कसे जगायचे हे आपणच ठरवायचे असते. काय घडून गेलंय ते परत येणार नसते, पण काय घडवूया अजूनही, हाच विचार करा.

शुभास्ते पंथानु!

# भय इथले संपत नाही...

**मुकुला राणे नवलकर**



शीर्षक वाचलं तेव्हां,मनात चालीसह उमटलं आणि काय आठवलं ?

सरती दुपार,निवलेली उन्हं,

वाफाळता चहाचा कप आणि दूरचित्रवाणीसंचाच्या पुढ्यात ठाण मांडून बसलेले आपण,..

कारण,आता वाहिन्यांचे प्रक्षेपण सुरु,आणि त्यातही दूरदर्शनवरील मालिका,महाश्वेताची ही वेळ..!

**भय इथले संपत नाही...**

यमन रागाची नितळ तरल सुरावट..

लताबाईंचे संथ लयीतील स्वर,

एक एका शब्दाचा अर्थानुरुप उच्चार,

त्यातून निर्माण होणारे गूढ भाव..आणि

ते भाव अधिक गडद करणारा..,

आर्त वाद्यमेळ..,आठवले..?

कवी ग्रेस यांचे शब्द,

पं.हृदयनाथ मंगेशकर यांचा स्वरसाज आणि स्वरसम्राज्ञींचा लखलखता सूर.

सारंच अद्भुत...!

हे भाव मुळात अवतरले ते एका कवितेच्या रुपात,पुढे त्याचं गीत झालं..

मनातील विमनस्कता अन् हताशा,

आपल्या सुहृदाला कळवावी म्हणून कागदावर उतरलेले....हे भावकाव्य.

खरंतर कवी ग्रेस यांच्या साहित्यावर, दुर्बोधतेचा आरोप केला जातो.

त्यांच्या सर्वच साहित्यकृती या लाघवी शब्दात अवतरतात..,परंतु

त्यांचे भावार्थ समजून घेताना मात्र,

त्यातील भावकल्लोळ तुम्हाला भरकटवतो

अर्थाचे भ्रम निर्माण होतात...

आणि हाती काही लागते म्हणावे,.. तोवर ते निसटून ही जाते..

अन् रसिकाला चकवा लागतो..

परंतु माणसाचं जीवन खरं तर अगदी

असंच आहे..!

फसवं..हुलकावणी देणारं.!

डोळ्यातली स्वप्न,बुद्धीचा तर्कवितर्क, मनातली हुरहुर आणि देहाची क्षमता...

या साऱ्यांचं रसायन,अजबरित्या जुळून आलं तरच जगण्याचा सुगम मार्ग निघतो;

नाहीतर जगणं,त्या चकव्यात भिरभिरत,

आत आत गुरफटत जाते.. ......आणि

माणूस अधिकाधिक भ्रमिष्ट होत जातो..

हेच तर घडते.. अन् यालाच तर,

**“जीवन ऐसे नाव..” आहे.**

अशा जगण्यातल्या चक्रव्यूहात अडकल्यावर,

ज्याची कधी कल्पनाही केली नाही,

असं एकेक अघटीत घडत जातं..,

अन् लक्षात येतं की,

त्या संभ्रमित गूढरम्यतेत एक सूक्ष्म असं..,

भय.. दाटलेलं आहे .

आठवा,गुमराह चित्रपटातील.,ते गाणं..!

गुमनाम है कोई ....बदनाम है कोई
किसको ख़बर,.. कौन है वो..,
अन्जान है कोई...!!

आणि या गाण्याचं,अंगावर सरसरुन काटा आणणारं संगीत.!

शब्दांपेक्षाही सुरांना अधिक भावसामर्थ्य असते,हे इथे सतत जाणवतं....

स्वयंसिद्ध सुरातून प्रफुल्लता आणता येते.. प्रसन्नता शिंपता येते,परंतु
सूर जसे उत्कट असतात तसे ते उदास ही असतात
आणि विचक्षण सूरातून भयही निर्माण होते.असो.

मानवी मनाच्या बांधणीत,भय हा अंतस्थ स्थायीभाव आहे ...
जगण्याच्या व्यवहारात भीती हीच छुपी कुलंगदा आहे.
तुमचा भित्रेपणा ही तुमच्या दांभिकतेची,
काळीकुट्ट छाया आहे.

हे थोडं विचित्र वाटेल,...
पण मनोव्यापाराचा खोलवर विचार
केला तर,
आपल्यातील षडरिपूं,बेकाबू होऊन
जेव्हां त्यांची स्फोटके बनतात..,
आणि पावलोपावली त्यांचे उद्विग्न,
प्रक्षोभक उद्रेक होत रहातात,...
तेव्हां त्याला भयच कारणीभूत असते.

आपल्याला राग येतो,लोभ वाटतो.
मोह होतो.. मत्सरही वाटतो.
कधी गर्व आणि मद वाढतो...त्यामागे,
कुठेतरी सुप्तपणे,भय कार्य करीत असते..

भय असते, नाकारले जाण्याचे ..!
भय असते, असलेले हरवण्याचे..!
भय असते, मिळविलेले गमावण्याचे..!

मग त्या भयगंडातून आपली हारजीत दिसू लागते..
त्या पराभूत जगण्याचा बागुलबुवा भेडसावू लागतो.
रोजचे व्यवहार मनासारखे घडत नाहीत

असे वाटत रहाते.
आतापर्यंत जे सुखं,माझ्याभोवती पिंगा घालत होते,
त्या सर्वांचे केंद्र आता सरकत चालले आहे,
माझे महत्त्व कमी होते आहे ...आणि
अशा भरकटलेल्या अवस्थेत डोळ्यासमोर चित्र विचित्र घटना घडू लागतात

वाटत राहते की,..
चारी बाजूंनी अंधारून आलं आहे...,
त्या मिट्ट काळोखात आपण चाचपडंत..,
ठेचाळतो आहोत,रक्तबंबाळ झालो आहोत.
आपली पकड ढिली होत चालली आहे,
आयुष्य हातून निसटून चाललं आहे.

या मानसिक अवस्थेला,गत आयुष्याची भीषण पार्श्वभूमी अधिकच गडद करते.

एकाधिकार हुकूमी वर्चस्वाने पिचलेला स्वाभिमान,
दांभिकते आड लपविलेली अगतिकता.

बेगडी श्रीमंतीचा थाट आणि दारुणं वास्तव यातील विसंगतीतून येणारी नामुष्की.

चार भिंतीत धुमसून मुसमुसणारी घुसमट आणि
चारचौघात ओढून ताणून मिरवलेला तोरा,

या लादलेल्या,परस्परविरोधी भूमिकांची काळी काजळी,हळूहळू मनात पसरत जाते

आणि अचानक जर परिस्थिती पालटली,..

एकाधिकारशाहीचा अस्त आणि विक्षिप्त दडपशाहीचा अंत झाला,

तर त्याचा मातंग मानूनही,रोजच्या कटकटीतून सुटका होवून,..

मोकळा झालेला श्वास,जास्त ठळकपणे जाणवतो

तेव्हां आतापर्यंत दबून राहिलेले सुप्तभाव

भुकेने वखवखलेल्या क्रूर श्वापदासारखे,

आपले भक्ष शोधू लागतात...

त्या जख्मी पशूला पाशवी सूडाची तहान असते...

बुभुक्षितपणे घेतलेला शोध,सहज सावज म्हणून बहुतेक,आप्तस्वकीयांनाच गाठतो आणि ती स्वार्थी हवेस,...

स्वतःच्या रक्ताचाच घात करते.

मी.. माझं.. मला..अशा आत्मकेंद्री,एकाकी पोकळ सुखाच्या विचारांनी पछाडलेल्या,..

दुबळ्या आणि पोखरलेल्या,न्यूनगंडग्रस्त मनाला,

कृतक उभारी देण्यासाठी,..

परिस्थितीला नामोहरम करण्यासाठी,

खरेखोटे कांगावे,आरोप प्रत्यारोप,

मान अपमान यांचे विपर्यस्त देखावे उभे केले जातात...

माझं सुख..माझं समाधान..माझी मनशांती कशात आहे ?

या सहज प्रश्नांला,उत्तर मिळविताना मात्र,

स्वतः भोवती..... भवति भवति फेरे घेत भुलभलैया निर्माण होतो.

जे हक्काचे आहे ते मिळावे असे प्रयत्न करताना

त्या जोडीला माझे कर्तव्य म्हणून मी काय करणार..? काय करु शकेन..?

एक समाजजीवी व्यक्ती म्हणून,

माझी कुवत,माझी ऐपत,दानत किती ?..

याचं भान ही उरंत नाही.

मनुष्यजन्म मिळाला आहे म्हणून येऊन चिकटणाऱ्या गोष्टींचा माज करताना,

त्यात आपले आजचे कर्तृत्व शून्य आहे,

याचाही विसर पडतो...आणि तेव्हां,...

एक व्यक्ती,एक माणूस म्हणून जगण्याची निम्न पातळी गाठली जाते.., आणि पटतं की,

हे सारे आहेत,विकृत मनाचे भेसूर चाळे...

हे आहेत काळ्याकुट्ट चित्ताचे दशावतारी खेळ.

हे आहे,सरळसोट वहात्या आयुष्याच्या,

तीरावरील अवस-पूनवेचे बिभत्स नाट्य ..

या आहेत,अंधाऱ्या भविष्याच्या,काळ्या

काळोख्या सावल्या....

यातूनच स्वार्थ,अहंकार,उन्मत्त उन्माद आदि दुरितांचे..........,

त्याचबरोबर हतबलता,नैराश्य आणि नकारात्मकतेतून,

नाकर्तेपणाचे....न फिटणारे कर्ज....

वाढत जाते.

आणि यातून सुटका करून घेण्यासाठी,

प्रकाशाकडे पाठ करून,

प्रयत्नांच्या वाटा बुजवल्या जातात तेव्हां,

गतीप्रगतीही खुंटते

मनाची उमेद,काळ्याकुट्ट..अंधाऱ्या,

भाकड भविष्याच्या गर्तेत,..खोल खोल कोसळंत जाते.

ही म्हणजे उघड्या डोळ्यांनी केलेली मूढ हाराकिरीच असते..

याविषयी संतपुरुष आणि मार्गदर्शक गुरुजनांनी म्हटले आहे की,

जोपर्यंत हे नश्वर शरिर आणि चंचल मन आपले वाटते आहे,माझे वाटते आहे..,

आणि तो देह,ते मन म्हणजेच मी आहे..

हा भ्रम आहे,

तोपर्यंत या भ्रांतीची छाया म्हणजे भय आहेच...आणि

देहभाव विरक्ती आणि मनभाव अनासक्ती साधली की शिल्लक काही उरतच नाही

कारण तेव्हा मी..मला..माझे..,हा गैरसमज नाहीसा होतो ...आणि त्याचबरोबर त्या 'मी'चे भय ही विरून गेलेलं असते..

ही झाली माणसाच्या अभ्युदयाच्या मार्गावर चालविणारी पथदर्शक देशणा ..!

जी प्रगल्भ जाणिवांना सहजी आत्मसात करता येईल..

आणि आज ना उद्या,प्रत्येकाला ते शक्य व्हावे,हे अपेक्षितच आहे.

परंतु याविषयी,सर्व सामान्य लोकजीवनात,

अर्थात रोजच्या जगण्यात,

प्रत्येकाला दिग्दर्शक ठरेल असा विचार स्वामी विवेकानंद यांनी मांडला आहे,

तो म्हणजे....

तुम्ही भीतीला जर पाठ दाखवलीत तर ती तुमच्यावर हावी होते...

तुमच्या मानगुटीवर बसते आणि तिच्या इच्छेनुसार काम करवून घेते...तुम्हाला अक्षरशः नाचवते.

पण जेव्हा तुम्ही,तुमच्या मनातील भीतीला ठामपणे सामोरे जाता,..

सकारात्मक विचार आणि शुभसंस्कार यांवर विश्वास ठेवून अदृश्य आव्हाने स्वीकारता,..

जेव्हां आचरणात शुद्ध विवेक आणि

नैतिक संयमन ह्यांचे अधिष्ठान मान्य करता

तेव्हांच या सुष्ट अथवा दुष्टचक्रात न अडकता कर्तव्यपूर्तीचे समाधान प्राप्त होते

आणि त्या आभासी भीतीवर विजय मिळून तुमची ती भीती संपुष्टात येते ..,

कारण मुळातच ही तुमची भीती,

तुमच्या कल्पनेत जन्माला आलेली असते.,

आणि म्हणूनच तुमच्या कल्पनेतच ती विराम पावते..

तेव्हां तुम्हाला अनुभव येतो की,

Life begins where fear ends...

हे सत्य आहे ..आणि लक्षात येते की,..

गुमनाम है कोई... बदनाम है कोई...

किसको खबर...कौन है वो..

अंजान है कोई....

असं बेभरवशी,कर्तृत्वशून्य...पालुपद आळवीत रहाणं,ही एक पळवाट आहे.

हे सर्व सामान्य स्वाभाविक दोषारोपण आहे

हा दुबळ्या मनाचा विकारी अविचार आहे.

आयुष्यात प्रत्येक प्रसंग,हर एक घटना,..

घडविणारा कर्ता..,

जो गुमनाम आहे,.. असा सोयीस्कर समज करून घेतला आहे,

तो दुसरा तिसरा कुणी नसून तुम्ही स्वतःच आहात...!

तो जो बदनाम आहे,..असं मानून आपण,

आपली सुटका करून घेतली आहे,

तो वेगळा कुणीही नाही,...तर

तुम्हीच स्वतःला बदनाम करीत आहात..

आणि तो,.....म्हणजे प्रत्यक्ष तुम्हीच,

स्वतःसाठी अनजान तर नाहीच नाही..

कारण,

सर्वचजण आपला आतला आवाज ऐकत असतात,..

अन् स्वतःला ओळखूनही असतात...,

भले त्याची कबुली ते स्वतःशीही देत नाही.

आणि म्हणूनच माणूस,त्याच्या जन्मापासून
रोजच्या जगण्यात,
आकस्मिक आणि अवांछित अशा अवघड
परिस्थितीत ,...
सभ्य,सुसंस्कृत वर्तनाने,माणूसकी जपत आणि
आपले मानसिक संतुलन सांभाळत,
समाधान आणि तृप्ती अनुभवू शकेल...

आणि आपली जीवनयात्रा,पावलोपावली,
उत्सवी शोभायमान आणि विस्मयकारक
आनंददायी..करु शकेल,..............जशी
कवी ग्रेस यांची स्वप्नाभासी शब्दकळा...!

अन्यथा ममत्व,अश्रध्दा आणि साशंकता
कुरवाळत,
मनुष्यजन्माला मिळालेला अनिर्वचनीय अभिशाप
भोगत,म्हणतच राहील की,.....
भय इथले संपत नाही.... !!

मुकुला प्रदीप नवलकर...

# Credits



**Kalpana Rane**

Editor



**Rohit Trilokekar**

Resident Editor



**Monica Rane Iyer**

Editorial Support



**Sanjana Kothare**

Editorial Support



**Shrinal Kothare**

Design Head



**Sunil Pawar**

Web Master